# SPIN COMMUNIQUE

NAME OF PUBLICATION DATE

www.loksatta.com

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

# लोकसत्ता

इंडियन एक्स्प्रेस ग्रुप

२.५० रुपये ● मुंबई, शनिवार, १८ नोव्हेंबर २००६ ● वर्ष ५९ ● अंक २६२ ● पृष्ठे १२ + वृत्तान्त + चतुरंग + वास्तुरंग ● शहर आवृत्ती ★ Reg. No.MH/MR/SOUTH-202/2006-08

छाया : गणेश शिर्सेकर



# जेसनची 'मोक्ष' गाथा!

प्रतिनिधी

**मोक्ष मिळविण्यासाठी कोणी हिमालयात जाऊन तपश्चर्या करतो तर कोणी** देवधर्माला लागतो. अर्थात, हे सगळे विचार वयाच्या साठी किंवा सत्तरीमध्ये येतात. लंडनला राहणाऱ्या जेसन लुईसच्या मनात मोक्षाचा विचार वयाच्या सव्विसाव्या वर्षीच आला! संन्यास घेऊन विरक्तीच्या मार्गाला न जाता त्याने निसर्गाशी जवळीक साधायचे ठरविले. पॅडलवर चालणारी बोट आणि सायकल घेऊन अकरा वर्षांपूर्वी तो जगभ्रमंतीला निघाला. बोटीचेही त्याने 'मोक्ष' असेच नामकरण केले. लंडनहून निघताना जेसनच्या मनाची पाटी आणि बोटही कोरी करकरीत होती. आता मात्र त्याच्या गाठी असंख्य अनुभव आणि बोटीवर सफरीदरम्यान भेटलेल्या जवळपास तीन हजार यारदोस्तांची नावे लिहिलेली आहेत. मोटर आणि वारा यांच्या मदतीशिवाय ३५ हजार मैलांचा प्रवास करत सध्या तो मुंबईत आला आहे. इथून पुढे शेवटच्या टप्प्यात आफ्रिका, इथिओपिया, सुदान, इजिप्त मार्गे तो लंडनला पोहोचणार आहे. जेसन लुईसचा लंडनमध्ये व्यवसाय होता. भ्रमंतीला निघण्याविषयीची कल्पना त्याचा मित्र पर्यावरण तज्ज्ञ स्टीव्ह स्मिथ मांडली. जेसनने ती लगेचच उचलून धरली. हा निर्णय घरच्यांना सांगितल्यावर त्यांची प्रतिक्रिया काय होती, या प्रश्नावर तो म्हणाला की, सुरुवातीला त्यांनी विरोधच केला, त्यांना माझ्या सुरक्षिततेची काळजी होती. पण मी माझ्या निर्णयावर ठाम होतो. त्यामुळे त्यानंतर त्यांनी या मोहिमेला पाठिंबा दिला. कधी शारीरिक तर कधी धार्मिक विविधतेमुळे एकमेकांचा द्वेष करण्यासाठी किंवा एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी आपल्याकडे अनेक कारणे असतात. एकाच पृथ्वीवर राहणाऱ्या माणसांमध्ये काही समान सूत्रेही असणारच. ती समानता शोधण्याच्या हेतूने खरे तर या प्रवासाला सुरुवात झाली. हे धाडसी पाऊल उचलायचे असेल, तर तरुणपणीच उचलायला हवे, वय उलटून गेल्यावर नुसत्या विचारांचा काहीही फायदा नसतो, हे जाणून त्याने वयाच्या सव्विसाव्या वर्षीच हे पाऊल उचलले. आपणही इतरांसारखे जीवन जगावे, असे वाटण्याचा प्रसंग गेल्या अकरा वर्षांत अनेकदा आला, पण त्या संसारगाड्यात मनस्वी जीवन जगणे शक्य नसल्यामुळे जेसनने ही वाट धरली. उमेदीचा काळ त्याने जग भ्रमंतीत घालवला आहे. त्यामुळे ही सफर संपल्यानंतर काय, या प्रश्नाचे निश्चित उत्तर त्याच्याकडे नव्हते. ढोबळ मानाने विविध देशांमधील मुलांसाठी एक सामायिक शैक्षणिक उपक्रम राबविण्याची इच्छा त्याने व्यक्त केली. आठ विविध देशांतील मुलांना घेऊन एखादी सफर काढावी, अशी योजनाही त्याच्या मनात आहे. सायकल आणि बोटीवर संपूर्ण संसार घेऊन त्याने हे अंतर कापले आहे. या मोहिमेत निसर्गाने अनुकूलता दाखविल्यामुळेच आतापर्यंतची सफर कोणत्याही मोठ्या धोक्याशिवाय पार पडल्याचे जेसनने सांगितले.